## प्रेसनोट
## पोलीस शिपाई भरती -२०१९.

---ooo---

**जळगाव जिल्हा पोलीस दलाचे आस्थापनेवर पोलीस शिपाई पदाचे १२८ रिक्त पदांची पोलीस भरती २०१९** करिता **दिनांक ०३ सप्टेबर, २०१९** रोजी वृत्तपत्रात जाहिरात प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.

सदरहू पोलीस शिपाई भरती-२०१९ च्या जाहिरातीत शासनाने मराठा समाजासाठी निर्माण केलेला एसईबीसी प्रवर्गासाठी काही जागा राखीव ठेवण्यात आलेल्या होत्या. परंतु मा. सुप्रीम कोर्टाने मराठा/एसईबीसी आरक्षण रद्द ठरविल्यामुळे महाराष्ट्र शासनाचे धोरणानुसार एसईबीसी प्रवर्गात आवेदन अर्ज सादर केलेल्या उमेदवारांना **खुला** किंवा **ईडब्ल्युएस** या प्रवर्गाचा पर्याय निवडण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. सदरहू पर्याय निवडण्याबाबत **दिनांक ०५/०८/२०२१ रोजी जळगांव जिल्हा पोलीस दलाकडून सदरहू जाहिरातीचे शुद्धीपत्रक वृत्तपत्रापत प्रसिद्ध करण्यात आले आहे. तसेच सदरचे शुद्धीपत्रक जळगांव जिल्हा पोलीस दलाचे संकेतस्थळावर देखील प्रसिद्ध करण्यात आले आहे.** पोलीस शिपाई भरती २०१९ साठी उमेदवारांनी ऑनलाईन सादर केलेल्या आवेदन अर्जात आवश्यक तो बदल करुन घेण्यासाठीचा कालावधी **दिनांक ५ ऑगस्ट ते १५ ऑगस्ट २०२१ पर्यंत नमूद करण्यात आला होता.**

सदरहू भरती प्रक्रियेसाठी ऑनलाईल आवेदन अर्जात एसईबीसी प्रवर्गातील उमेदवारांना खुला **किंवा** ईडब्ल्युएस प्रवर्ग निवडण्यासाठी तसेच सर्व उमेदवारांना पासवर्ड बदल करुन घेण्यासाठी दिनांक १५ ऑगस्ट, २०२१ पर्यंत मुदत देण्यात आली आहे. परंतु पोलीस शिपाई भरती-२०१९ साठी ऑनलाईन आवदेन अर्ज सादर केलेल्या उमेदवारांना आवेदन अर्जात प्रवर्ग बदल तसेच पासवर्ड बदल इमेल आयडी अपडेट करण्यासाठी येत असलेल्या अडी अडचणी लक्षात घेऊन सदरचा बदल करुन घेण्यासाठीची मुदत आता वाढवून **दिनांक २२ ऑगस्ट, २०२१ रोजी २४.०० वाजेपर्यंत करण्यात येत आहे.**

**उमेदवारांनी www.mahapolice.gov.in ह्या संकेतस्थळावर जाऊन पोलीस कॉर्नर ह्या बटनला क्लीक करुन पोलीस भरती २०१९ येथे क्लीक करावे. पोलीस अधीक्षक, जळगांव घटकावर जाऊन विकल्प द्यावा अथवा इमेल आयडी/पासवर्ड बदल करुन घ्यावा.**

तसेच जळगांव जिल्हा पोलीस दलाचे आस्थापनेवरील १२८ पोलीस शिपाई पदासाठी राबविण्यात येत असलेल्या भरती प्रक्रियेसाठी शासनाचे निर्देशानुसार ओएमआर वेडंर मे.न्यास कम्युनिकेशन प्रा.लि.मुंबई यांची निवड करण्यात आलेली असुन पोलीस भरती प्रक्रियेच्या अनुषंगाने जळगांव जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयात **स्वतंत्र पोलीस भरती -२०१९ संदर्भात मदत कक्ष** निर्माण करण्यात येत आहे.

**जळगांव जिल्हा पोलीस भरती-२०१९ साठी मदत कक्षात पोलीस निरीक्षक, मानव संसाधन यांची जबाबदार समन्वय अधिकारी** म्हणून नेमणूक करण्यात येत आहे. त्यांसाठी त्याचा **मो.क्र.९८२१६६५६९३** असा आहे. तसेच मदत कक्षातील **दूरध्वनी क्रमांक ०२५७-२२३३५६९** असा आहे. जळगांव जिल्हा पोलीस दलाच्या सन-२०१९ च्या पोलीस शिपाई भरती संदर्भात उमेदवारांना काही अडचणी समस्या असतील तर उमेदवारांनी स्वतंत्र मदत कक्षाकडे संपर्क करुन त्या सोडवून घ्याव्यात.

तसेच सर्व ऑनलाईन अर्ज सादर केलेल्या उमेदवारांना असे सुचीत करण्यात येते की, जळगांव जिल्हा पोलीस शिपाई भरती २०१९ साठी गणेश उत्सवापूर्वी लेखी परिक्षेचे आयोजन करण्याचे नियोजन सबंधित वेंडर व जिल्हा पोलीस दलाकडून

करण्यात येणार आहे. याबाबत सर्व उमेदवारांनी भरती प्रक्रियेसंदर्भात संकेतस्थळावर/वृत्तपत्रात/पोलीस भरती सदंर्भात इतर माध्यमातून देण्यात येत असलेल्या सुचनांकडे लक्ष ठेवावे.

**पोलीस शिपाई भरती प्रक्रिया अंत्यत पारदर्शी पणे राबविण्यात येत असुन त्यात कुणालाही हस्तक्षेप करता येणार नाही. तसेच एजंट बाहेरच्या दलाल लोकांकडून उमेदवारांकडून पैशाची मागणी केल्यास त्वरीत लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी संपर्क साधावा. व त्याबाबत या कार्यालयास कळवावे.**

**( डॉ. प्रविण मुंढे )**
**पोलीस अधीक्षक जळगांव**